तरुण भारत सोमवार, २२ सप्टेंबर २०२५

# व्यावसायिक शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी उद्योजक व्हावे

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे

**कोल्हापूर :** शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्या प्रेरणेने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यामध्ये पारंपारिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी देशाच्या प्रगतीला हातभार लावावा. अनेक उद्योजक तयार व्हावेत, अशी अपेक्षा होती. आज त्याच प्रकारे ही संस्था विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची संधी देऊन स्वयंपूर्ण बनवित आहे. ही अत्यंत समाधानकारक बाबत आहे. असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी मांडले.ते जिल्हा कौशल्य् विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, कोल्हापूर व दे आसरा फाउंडेशन आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजक मेळाव्यात बोलत होते. यावेळी अजय पाटील, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उमेश पाटील, प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी स्नेहा ननावरे, दे आसरा फाउंडेशन यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अनिल वाडीकर, ग्रोथ मार्केटींग तज्ञ यांनी मार्गदर्शन केले. उद्योजग महेश तोरगळकर यांच्या मुलाखती नंतर युवा उद्योजकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पाहुण्यांनी दिली. तर आभार अमोल जाधव यांनी मानले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, प्रा. सनी काळे, डॉ. उमेश दबडे, प्रा. डॉ अमोल मोहिते, प्रा. आर. आर. माने, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

तरुण भारत सोमवार, २२ सप्टेंबर २०२५

# जगातील २ टक्के संशोधकांत 'विवेकानंद'चे डॉ. संजय लट्ठे

प्रतिनिधी
कोल्हापूर

- अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या ताज्या क्रमवारीत सलग सहाव्या वर्षी पुनर्मानांकन

जगभरातील आघाडीच्या २ टक्के संशोधकांची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली आहे. यात येथील विवेकानंद कॉलेजच्या भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय लट्ठे यांना सलग सहाव्या वर्षी पुनर्मानांकन प्राप्त झाले आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गतवर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील २ टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीत डॉ. संजय लट्ठे यांना स्थान मिळाले होते. याही वर्षी त्यांना पुनर्मानांकन मिळाले आहे.

यावर्षी स्टॅनफोर्ड विद्यापीठाने वेगवेगळ्या प्रकारच्या सूची जाहीर केल्या आहेत. त्यापैकी एक सूची संशोधकाच्या सार्वकालिक कारकिर्दीचा वेध घेऊन तयार केली आहे. दुसरी वार्षिक कामगिरीवर आधारित आहे. 'स्कोपस' डाटाबेसवर आधारित या यादीसाठी १९६० ते २०२४ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा विचार करण्यात आला आहे.

डॉ. संजय लट्ठे यांना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे आणि प्रबंधक सचिन धनवडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

हॅलो प्रभात

# महाराष्ट्र दिनमान पुरस्काराने प्रा. अभयकुमार साळुंखे यांचा गौरव

कोल्हापूर : हॅलो प्रभात

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना महाराष्ट्र दिनमान सन्मान पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला.



कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांची प्रतिमा, शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन प्राचार्य साळुंखे यांचा सत्कार करण्यात आला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज होते, तर खासदार धनंजय महाडीक विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाराष्ट्र दिनमानचा पहिला वर्धापन दिन हॉटेल सयाजी येथे साजरा करण्यात आला. या प्रसंगी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, कला, चित्रपट व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला.

विजय चोरमारे यांनी प्रास्ताविक करताना साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्यानंतर संस्थेचा विकास व प्रगती सचोटीने, कौशल्यपूर्ण प्रशासकीय नेतृत्वाखाली साध्य केला असल्याचे सांगितले.

श्री.शेलार म्हणाले, प्रा.अभयकुमार साळुंखे यांनी महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांतील ४५० हून अधिक शाखांचे कुशल नेतृत्व केले असून, शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र दिनमान सन्मान प्रदान करण्यात येत आहे, याचा मला अभिमान वाटतो.या समारंभात शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव पी. बी. साबळे, डॉ. सुनिलकुमार लवटे, डॉ. भारत पाटणकर, डॉ. संजय डी. पाटील, क्रीडापटू शैलजा साळोखे, हिंदकेसरी दीनानाथ सिंह, वैभव नायकवडी, गणी आजरेकर आदी मान्यवरांना गौरविण्यात आले.या सोहळ्यास पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.